FORM-1 A

N.C.R.B.
I.I.F.-1

# पहिली खबर

## FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम 154 अन्वये (Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य महाराष्ट्र, जिल्हा मुंबई, पोलीस ठाणे ला. प्र. वि, पहिली खबर क्र. ९८/२०१९, वर्ष २०१९ दिनांक ०३/०४/२०१९
State District Police Station FIR No. Year Date

2. (i) अधिनियम Act भ्र. प्र. अधिनियम १९८८, कलमे Sections ७, १२
(ii) अधिनियम Act सुधारित अधि. २०१८, कलमे Sections
(iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections

3. (a) अपराधाची घटना : वार बुधवार तारीख पासून 06/02/19, वेळ १३:४५ वा, तारीख पर्यंत सदर, वेळ १४:२४ वा
Occurrence of offence : Day Date from Time Date to Time
वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा. Tick applicable portion)
(1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
(6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (10) 18.00 ते 06.00
(b) पो. ठा. ला माहिती मिळालेचा तारीख २२/०९/२०१९, वेळ १२:०० वा.
Information received at P.S. Date Time
(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. २४/१९, तारीख ०३/०४/२०१९, वेळ १५:३० वा
General Diary Reference : Entry No. Date Time

4. माहितीचा प्रकार Type of Information : लेखी, लेखी / तोंडी Written / Oral लेखी

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा ..., चौकी / बीट / दुरक्षेत्र नाव व क्र. ...
Place of Occurrence : (a) Direction and distance from P.S. Chouki/Beat/O.P. Name and No.
(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव दामु कंपाऊंड, बावडीवाला कोर्ट, चिकुवाडी, मालवणी, मालाड (प), मुंबई येथील गोडाऊन, ठिकाणाचे नंबर, गल्ली, रस्त्याचे नाव
Address of Occurrence Name No. If any Ward Name of road
जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण ..., गाव ..., पोस्ट ..., तालुका ..., जिल्हा ..., राज्य ...
Nearest identifiable Place Village Post Taluka Distt. State
(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो. स्टे. चे नाव ..., तालुका ..., जिल्हा ..., राज्य ...
In case, outside the limit of this Police Station Taluka Distt. State

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
(a) नाव Name विनोद जैस्वार (b) वडीलाचे / पतीचे नाव रमाशंकर जैस्वार
Father's /Husband's Name
(c) जन्म तारीख व वय ३८ वर्षे (d) राष्ट्रीयत्व भारतीय फोन नं. ९८६७४०९७४६
Date of Birth & Age Nationality Phone No.
(e) पारपत्र क्रमांक ... दिल्याचा दिनांक ... दिल्याचे ठिकाण ... (f) व्यवसाय ...
Passport No. Date of Issue Place of Issue Occupation
(g) धर्म Religion हिंदु, जात Caste ..., जनजात Sub Caste ...
(h) पत्ता : लक्ष्मी सदन, सागर बिल्डिंग, १०३ मराठे रोड, एम. कात्रज, डी. एन. अंधेरी (पूर्व), मुंबई-६९, गल्ली / सर्व नं. ..., घर / नाव नंबर ..., फोन / मो. नंबर ..., पॅन नं. ..., वोटर्स नं. ...
Address : Ward House/Name No. Phone/M. No. Pan No. Card No.
रस्त्याचे नाव ... जवळचे प्रसिद्ध ठिकाण ... गाव ... पोस्ट ... पो. स्टे. ...
Road Nearest identifiable place Village Post P. Stn.
तालुका ... जिल्हा ... राज्य ... सध्याचा पत्ता ...
Taluka Distt. State Present Address

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयीताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासीक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
Details Name & Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

(१) आलम, मुकादम, इमारत व कारखाने विभाग, पी/उत्तर वॉर्ड बृ. म. न. पा, मालाड (प), मुंबई
(२) पाटील कनिष्ठ अभियंता, इमारत व कारखाने विभाग, पी/उत्तर वॉर्ड, बृ. म. न. पा, मालाड (प), मुंबई

ASSTT. COMMI... ANTI-COR...

यातील फिर्यादी श्री. विनोद रमाशंकर जैस्वार वय २८ वर्षे, धंदा - डेकोरेशन, राही - लक्ष्मी सुख - सागर बिल्डिंग, ७०३ फ्लॅट, एम.आय.डी.सी., अंधेरी (पुर्व), मुंबई - ५९ यांची सविस्तर फिर्याद स्वतंत्र कागदावर नोंद करण्यात आली असून, तोच गुन्ह्याचा प्रथम खबरी अहवाल म्हणून संबोधण्यात येत आहे.

समक्ष

(signature)
03/05/19
(विजयकुमार डोके)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग
मुंबई

विनोद जैस्वार
3/5/19

फिर्याद दिनांक— ०३/०५/२०१९

श्री. विनोद रमाशंकर जैस्वार, वय ३८ वर्षे, धंदा—व्यवसाय (डेकोरेटिंग), रा.ठि. लक्ष्मी सुखसागर बिल्डिंग, १०३ मरोळ एम.आय.डी.सी., अंधेरी (पु), मुंबई–४०००५९, मोबाईल क्र. ९८६७४०१७४६, आधारकार्ड क्र. २८६८०७२५९१३४, पॅनकार्ड क्र. AINPJ0261B

..........

मी वरील प्रमाणे असून वर नमुद पत्त्यावर मागील ५ वर्षापासून माझे कुटुंबियासह रहावयास आहे. माझा चित्रपटाच्या शुटींगसाठी लागणारे साहित्य भाडयाने द्यायचा व्यवसाय मागील दहा वर्षापासून करीत आहे. सदर व्यवसायाकरीता लागणारे सामान व साहित्य ठेवण्यासाठी मी, दामू कंपाऊंड बावडीवाला प्लॉट, चिकुवाडी, मालवणी, मालाड, मुंबई हा प्लॉट श्री. धर्मेंद्र पाटील यांच्याकडून मागील ३ वर्षापासून भाडेतत्वावर चालविण्यास घेतला असून सदर प्लॉटवर गोडावून आहे. दिनांक १६/०१/२०१९ रोजी बृहन्मुंबई महानगरपालिकेचे पी/नॉर्थ वॉर्ड मधील इमारत व कारखाने विभागाचे कनिष्ठ अभियंता श्री. पाटील साहेब व मुकादम आलम हे माझे गोडावुन जवळ आले. त्यावेळी त्यांनी गोडावुनचा मुख्य दरवाजा उघडण्यास सांगितले. गोडावुनचा मुख्य दरवाजा उघडल्यानंतर त्यांनी गोडावुनची पाहणी केली व मला त्यादिवशी १७.०० वा. ग्रिन व्हिलेज हॉटेल मध्ये भेटण्यास बोलाविले. त्याप्रमाणे श्री. पाटील साहेब व मुकादम आलम यांना मी ग्रिन व्हिलेज हॉटेलमध्ये जावून भेटलो. त्यावेळी श्री. आलम यांनी मला गोडावुनवर उभे केलेले छत काढण्यास सांगितले. तसेच सदर छत ठेवायचे असल्यास प्रति वर्षी रू. २,००,०००/— ( दोन लाख रूपये ) प्रमाणे तीन वर्षाचे रू. ६,००,०००/— ( सहा लाख रूपये ) इतकी रक्कम दया, तर छत तोडणार नाही. जर सदरची रक्कम दिली नाही तर छत जे.सी.बी. मागवून तोडली जाईल. आपणास कोणत्याही परिस्थितीत सोडणार नाही.

त्यावेळी श्री. आलम यांनी माझ्याकडे रू. ६,००,०००/— लाचेची मागणी केली. त्यावेळी श्री. आलम यांना इतकी रक्कम माझेकडे नसून ती मी देऊ शकत नसल्याचे सांगितले. माझेकडे इतकी रक्कम नसल्याने मी दिनांक १७/०१/२०१९ रोजी छत काढून टाकले. गोडावूनच्या जागेवर दिनांक २१/०१/२०१९ रोजी श्री. आलम व पाटील साहेब आले. त्यांनी तेथील छत काढल्याचे पाहिले व त्यानंतर मला सांगितले की, पैसे द्यायचे नसतील तर येथून सर्व सामान ताबडतोब दुसरीकडे घेवून जा अन्यथा रू. १५,००,०००/— (पंधरा लाख) सामानाचे भंगारात रू. १५,०००/— (पंधरा हजार) सुध्दा येणार नाहीत. तेव्हा मी, श्री. आलम व पाटील साहेब यांना सांगितले की, आपणास छताचा प्रॉब्लेम होता म्हणून मी छत काढून टाकले आहे. त्यामुळे मला आता कोणताही त्रास देऊ नका. त्यावेळी श्री. आलम यांनी दिनांक २३/०१/२०१९ रोजी पर्यंत जर सामान हलविले नाही तर स्वत: येवून सामान तोडणार असल्याचे मला सांगितले.

श्री. आलम व पाटील साहेब यांना लाच देण्याची माझी इच्छा नसल्याने मी दिनांक २२/०१/२०१९ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे तक्रार देण्यास आलो. पोनि डोके यांनी माझी स्वहस्ताक्षरात सविस्तर लेखी तक्रार लिहून घेतली. त्यावेळी सपोआ तेंडुलकर हे सुध्दा हजर होते. माझी लेखी तक्रार नोंद केल्यानंतर दोन शासकीय पंचाना बोलाविण्यात येवून त्यांचेसमक्ष पडताळणी करण्यात आली. त्याच दिवशी आंम्ही पडताळणीकरीता श्री. आलम व पाटील साहेब यांच्या कार्यालयात गेलो असता ते मिळून आले नाहीत. त्यावेळी पोनि डोके यांनी त्या दिवशीची पडताळणी कारवाई स्थगित केली.

दिनांक २२/०१/२०१९ रोजीच्या पडताळणी कारवाईनंतर माझे श्री. आलम यांचेशी मोबाईलवर बोलणे झाले असता त्यांनी दिनाक ०४/०२/२०१९ रोजी दामू कंपाऊंड बावडीवाला प्लॉट, चिकुवाडी, मालवणी, मालाड (प.) मुंबई येथील गोडावुनच्या ठिकाणी भेटण्यास येईल असे मला सांगितले. सदरची माहिती मी, पोनि डोके यांना मोबाईलवर सांगितली. दिनांक ०४/०२/२०१९ रोजी मी, पंच व पडताळणी पथक हे माझे गोडावुन येथे आलो. त्याठिकाणी माझा भाऊ अरविंद जैस्वार हजर होता. त्याने श्री. आलम यांना मोबाईलव्दारे संपर्क करुन विचारणा केली असता त्यांनी कामात व्यस्त असल्याने भेटण्यास येणार नाही असे सांगून दि. ०५/०२/२०१९ रोजी भेटण्यास येईन असे सांगितले. त्यामुळे त्यादिवशीची पडताळणी कारवाई होवू शकली नाही. दिनांक ०५/०२/२०१९ रोजी मी, पंच व पडताळणी पथक हे माझे गोडावुन येथे

आलो. तेथे हजर असलेला माझा भाऊ अरविंद जैस्वार याने श्री. आलम यांना मोबाईलव्दारे संपर्क करुन विचारणा केली असता त्यांनी निष्कासनाच्या कामात व्यस्त असल्याने भेटण्यास येणार नाही असे सांगून दि. ०६/०२/२०१९ रोजी भेटण्यास येईन असे सांगितले. त्यामुळे त्यादिवशीची पडताळणी कारवाई होवू शकली नाही.

दिनांक ०६/०२/२०१९ रोजी मी, माझा भाऊ अरविंद जैस्वार, पंच व पडताळणी पथक हे माझे गोडावुनमध्ये हजर होतो. श्री. आलम व श्री. पाटील हे १३.५० वाजता गोडावुनमध्ये आले. पडताळणी दरम्यान श्री. आलम यांनी गोडावुनवर कारवाई न करण्यासाठी दोन्ही हातांची बोटे दाखवत सहा लाख रुपये लाचेची मागणी केली. एवढी रक्कम शक्य नसल्याचे मी सांगितले. त्यानंतर लोकसेवक श्री. आलम यांनी एका हाताची चार बोटे दाखवत चार लाख रुपये लाचेची मागणी केली. एवढी रक्कम जास्त होत असून कमी करण्याची विनंती केली. त्यावर लोकसेवक श्री. आलम यांनीच एका हाताची तीन बोटे दाखवत तीन लाख रुपये लाचेची मागणी केली. एवढी रक्कम जवळ नसल्याने रक्कम जमा करण्यासाठी शुक्रवार पर्यंत मी वेळ मागून घेतली. लोकसेवक श्री. आलम यांनी पैसे जमा झाल्यावर शुक्रवारी फोन करण्यास सांगितले. वरील नमुद दि. ०६/०२/२०१९ रोजीच्या पडताळणी कारवाई दरम्यान माझे, लोकसेवक श्री. आलम व लोकसेवक श्री. पाटील यांचेशी झालेले संभाषण मला लावलेल्या डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये ध्वनिमुद्रित करण्यात आले आहे.

त्यानंतर दिनांक ०८/०२/२०१९ रोजी १२.०० वाजता पंच, पडताळणी पथक हे माझे गोडावुनमध्ये आले. मी लाच म्हणून देण्याकरीता माझेजवळ असलेली रु. २,८६,५००/– ही रक्कम पोनि डोके यांच्याकडे दिली. त्यानंतर माझा भाऊ श्री. अरविंद जैस्वार याने श्री. आलम यांना मोबाईलव्दारे संपर्क केला असता त्यांनी कॉल उचलला नाही. श्री. अरविंद जैस्वार यांनी पुन्हा कॉल केला असता श्री. आलम यांनी कॉल उचलला नाही. पो.नि.डोके यांनी लोकसेवक स्वत: संपर्क करतील म्हणून त्यांच्या कॉलची वाट पाहू असे सांगितले. लोकसेवक यांचा कॉल न आल्याने त्यादिवशी सापळा कारवाई होवू शकली नाही. त्यानंतर आजअखेर मुकादम आलम किंवा पाटील हे दोघे माझ्याकडे पैसे स्विकारण्यासाठी आले नाहीत किंवा मला त्याबाबत संपर्क केला नाही. त्यामुळे लाचेची रक्कम स्विकारण्याची शक्यता नाही.

त्यामुळे आज रोजी मी, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई कार्यालयात लोकसेवक श्री. आलम, मुकादम व लोकसेवक श्री. पाटील, कनिष्ठ अभियंता, इमारत व कारखाने विभाग, पी/नॉर्थ वॉर्ड, बुहन्मुंबई महानगरपालिका यांचेविरुध्द फिर्याद देण्याकरीता आलो. तरी लोकसेवक श्री. आलम यांनी पडताळणी दरम्यान दि. ०६/०२/२०१९ रोजी स्वत:करीता रू. ३,००,०००/– इतक्या लाचेची मागणी केली व लोकसेवक श्री. पाटील यांनी स्वत: लोकसेवक श्री. आलम याचेबरोबर उपस्थित राहून त्यास लाचेची मागणी करण्यासाठी प्रोत्साहन दिले म्हणून माझी त्यांच्या विरुध्द् कायदेशीर फिर्याद आहे.

माझा जबाब मराठीत संगणकीकृत केला असून तो मी वाचुन पाहिला असता तो मी सांगितल्याप्रमाणे बरोबर आहे.

समक्ष
(विजयकुमार डोके)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

8. तक्रारदाराने/फिर्यादीने तक्रार करण्याकरीता झालेल्या विलंबाची कारणे ........ पडताळणी नंतर
Reasons for delay in reporting by the complainant/informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भुत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.
Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

........................................................................................................

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भुत मालमत्तेचे एकूण मुल्य ........ लाचेची मागणी रु. 3,00000/-
Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक : ........
Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.
First Information brief contents (Attach separate sheet. if required) : Detail write down back blank page.

वरील नमुद तारीख वेळी व ठिकाणी आरोपी लोकसेवक आलम, मुकादम, बृ.म.न.पा, पी/उत्तर वॉर्ड यांनी "फि" यांचे हुम्म कंपाऊंड, बावडीनाका कोर्ट, चिंचुवाडी, मालवणी, मालाड (प), मुंबई येथील तोडावुनवर कारवाई न करण्यासाठी अप्रमाणिकपणे स्वत: करिता गैरलाभ मिळविण्यासाठी रु.3,00000/- लाचेची मागणी केली. आलोसे पाटील कनिष्ठ अभियंता यांनी गुन्ह्यास प्रोत्साहन दिले म्हणुन भ्र.प्र.अधि १९८८ (सुधारीत अधि २०१८) कलम ७, १२ अन्वये गुन्हा नोंद

13. केलेली कार्यवाही :- 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

विजयकुमार डोके, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि, मुंबई

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

........................................................................................................

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ........, जिल्हा ........, राज्य ........,

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.) ........ Rank........ No. ........ to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to ........ (3) Transferred to P.S ........, District ........ on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant/informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/informant, free of cost.

(R.O.A.C.)

3/5/19

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression of the Complainant / Informant.

03/05/19

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer In-charge, Police Station
संपूर्ण नाव Name विजयकुमार डोके
पदनाम Rank पोलीस निरीक्षक
तपासिक अं. चा कोड. क्र.

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख ........
1. Date and time of submitted to the Court.

Posting
Code No. of I. O. ........

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4.तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.
Copy to, 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of **First Information Report**